महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार कक्ष क्र. ४१८,
चौथा मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई- ४०० ०३२
Email **ID: dattatray.kharge@nic.in**

---

क्रमांक: मान्यता-२०२१/ (७४/२१)/ मशि-४ दिनांक: १० मार्च, २०२१

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषी विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

विषय: शै.व.२०२१-२२ साठी इरादापत्र मिळण्याबाबत प्राप्त झालेल्या नविन महाविद्यालयांच्या प्रस्तावांपैकी विद्यापीठस्तरावरुन नाकारण्यात आलेले प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (घ) च्या तरतूदीनुसार शासनस्तरावर मागविणेबाबत.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (३) (घ) खालील परंतूकामध्ये पुढील प्रमाणे तरतूद आहे.

"परंतु, अपवादात्मक प्रकरणांमध्ये व कारणे लेखी नमूद करुन, उच्च शिक्षणाच्या महाविद्यालयाला किंवा परिसंस्थेला इरादापत्र देण्यासाठी विद्यापीठाने शिफारस न केलेल्या कोणत्याही अर्जास राज्य शासनाकडून मान्यता देता येईल."

विद्यापीठांकडून नाकारण्यात आलेले प्रस्ताव शासनस्तरावर मागविण्याबाबत शासनास प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने अधिनियमातील उपरोक्त तरतूदीस अनुसरुन शै.व.२०२१-२२ साठी इरादापत्र मिळण्याबाबत प्राप्त झालेल्या नविन महाविद्यालयांच्या प्रस्तावांपैकी विद्यापीठांनी त्यांच्या स्तरावर नाकारलेले प्रस्ताव सोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविल्याप्रमाणे परिपुर्ण माहितीसह शासनास दिनांक १६.०३.२०२१ पर्यंत सादर करावेत.

सदर प्रस्ताव विद्यापीठाच्या जबाबदार अधिकारी/ कर्मचा-यामार्फत व्यक्तीश: विहित कालावधीत शासनास प्राप्त होतील याची खबरदारी घ्यावी.

सोबत: विवरणपत्र

(द.व. खारके)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,
निवड नस्ती (मशि-४)

## विवरणपत्र

| विद्यापीठाचे नाव | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | संस्थेचे/ महाविद्यालयाचे नाव | विद्याशाखा/ अभ्यासक्रम | बृहत आराखड्यातील बिंदू/ ठिकाण | प्रस्ताव नाकारण्याची कारणे (विद्यापीठाचे अभिप्राय) |
| 1 | | | | |
| 2 | | | | |
| 3 | | | | |